लोकमत

# सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियान



**राजुरी येथील सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालयात आळेफाटा पोलीस ठाण्याच्यावतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविताना.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजुरी :** राजुरी (ता. जुन्नर) येथील सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना रस्तेविषयक अद्ययावत विविध कायद्यांची माहिती दिली. रस्त्यावर वाहन चालवत असताना वाहतूक नियमांचे पालन प्रत्यकाने केले पाहिजे, सामान्य जनतेची जागृती करुन सामान्य जनतेचे जनजीवन सुकर करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे विद्यार्थ्यांना त्यांनी आव्हान केले.

आजचे विद्यार्थी उद्याच्या भारताचे आधारस्तंभ, भविष्य आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय झोपे, उपप्राचार्य पी. बालारामुडू, पोलीस नाईक पठारे, गोन्हाने, फडसाहेब पोलीस कॉन्स्टेबल फलके, ढोबळे, आनंदगावकर, विभागप्रमुख प्रा. अमोल पाटील, मनोज कुमार, प्रा. नीलेश पिंजरकर, प्रा. मनिकंठा रेड्डी, ग्रंथपाल उद्धव भारती, मेसा समन्वयक प्रा. दीपककुमार, प्रा. सचिन दिघे, प्रा. योगेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नागेश लेंभे यांनी केले. सूरज मेहेर आणि राकेश शेलार यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे संयोजन सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# रानडुकरांमुळे शेतातील मक्याचे नुकसान

राजुरी : उंचखडक येथील आबाटेक मळ्यामधील दोन शेतकऱ्यांच्या शेतातील मक्याच्या पिकाचे रानडुकरांनी मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याची घटना घडली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार : उंचखडक (ता. जुन्नर) येथील आबाटेक वस्तीवरील रंगनाथ बबन कणसे यांची एक एकर व एकनाथ दावला कणसे यांची दीड एकर मका लावला होता, अशा या दोन शेतकऱ्यांनी जवळपास अडीच एकर क्षेत्रात मका लावला होता. मका आता काढायला आलेला असताना या परिसरात असलेल्या रानडुकरांनी या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले असून हे पिक पूर्णपणे वाया गेले असल्याने या शेतकऱ्याचे नुकसान झालेले आहे. डुकरांनी केलेल्या पिकाच्या नुकसानीचा पंचनामा गावकामगार तलाठी, तसेच वनविभागाचे अधिकारी जे. बी. सानप यांनी केला आहे. दरम्यान, या परिसरात रानडुकरांचा मोठ्या प्रमाणात वावर असून गेल्याच आठवड्यात राजुरी येथील बाळासाहेब घंगाळे या शेतकऱ्याच्या शेतातील दोन एकर मकापिकाचे नुकसान रानडुकरांनी केले होते.